मंत्रालयीन सेवा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
तिसरा मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दुरध्वनी क्रमांक : ०२२- २२८२६८११ Email :- adm1.fd@maharashtra.gov.in

**क्रमांक:** विविआ-२०२४/प्र.क्र.२३६/प्रशासन -१ दि. ०१ जानेवारी,२०२५

**प्रति,**

संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई.

**विषय :** सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची पदावर करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता जाहीरात देण्याबाबत.

**संदर्भ :** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७.१२.२०१६

**महोदय,**

वित्त विभागातील कामकाजाचा तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियम, वेतननिश्चिती, वेतनआयोग, न्यायालयीन प्रकरणे, सेवा व आस्थापनाविषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या १ अवर सचिव, १ कक्ष अधिकारी तसेच १ सहायक कक्ष अधिकारी यांची १ वर्षाकरिता वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची असून त्याकरिता प्रसिध्द करावयाच्या जाहीरातीचा मसुदा सोबत जोडला आहे.

तरी सदर जाहिरात दिनांक रोजीच्या मुंबईतील मराठी (अधिक खपाच्या) एका वर्तमानपत्रात नियमानुसार प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

रश्मी जाधव

( रश्मी जाधव )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत सहपत्रासह आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

कक्ष अधिकारी, संगणक कक्ष, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

यांना विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेला जाहिरातीचा मसुदा वित्त विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.

## Details on Website

## वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

**सेवानिवृत्त अवर सचिव, कक्ष अधिकारी व सहायक कक्ष अधिकारी यांची आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

**विभागाची आवश्यकता :**

वित्त विभागातील कामकाजाचा तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियम, वेतननिश्चिती, वेतनआयोग, न्यायालयीन प्रकरणे, सेवा व आस्थापना इ. विषयक कामकाजाचा अनुभव असलेल्या अवर सचिव, कक्ष अधिकारी तसेच सहायक कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांची पुढीलप्रमाणे १ वर्षासाठी वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे आवश्यकेतनुसार करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे :-

| अ.क्र. | पद | पदसंख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | अवर सचिव | १ | सुधारित निवृत्तिवेतन योजनेच्या अनुषंगाने कार्यपध्दती निश्चित करणे, राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली संदर्भातील नियम तयार करणे, महाराष्ट्र नागरी सेवा नियमात सुधारणा करणे |
| २ | कक्ष अधिकारी | ५ | वित्त विभागातील कामकाज तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे अद्यावतीकरण व सेवाविषयक कामकाज |
| ३ | सहायक कक्ष अधिकारी | १ | वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतनश्रेण्या सुधारित करणे, वेतननिश्चितीविषयक कामकाज, न्यायालयीन प्रकरणे हाताळणे |

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती प्रथमत: एक वर्षाकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/ १३, दि. १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) उमेदवार मंत्रालीयन प्रशासकीय विभागातील अवर सचिव, कक्ष अधिकारी व सहायक कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.

३) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

४) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

५) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

६) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

७) उमेदवाराने सदर पदाकरिता वेबसाईटवरील जाहिरात पाहून adm१.fd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून त्यांचे अर्ज दि.०७.०१.२०२५ पर्यंत सादर करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२८२६८११ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या **सेवानिवृत्त** अधिकारी/कर्मचारी **यांनी** अर्ज सादर केल्यास **अशा** अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. **तसेच** अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

९) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१०) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यास वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

११) **करार पध्दतीच्या** नियुक्तीवरील कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी हे संबंधित सह सचिव/ उप **सचिव** यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१२) इतर अटी व **शर्ती** सामान्य प्रशासन विभागाच्या **क्र.संकीर्ण**-२७१५/प्र.क्र.१००/ १३, दि. १७ डिसेंबर, २०१६ **च्या** शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

--x--

# अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्तीकरण्याकरिता अर्ज

| |
|---|
| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-...................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-...................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-...................................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-...................................................................

५) जन्म दिनांक व वय :-...................................................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

७) अनुभव :-...................................................................

८) वित्त विभागाच्या संकेतस्थळावर दि. रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने या पदासाठी मी काम करण्यास इच्छुक असून जाहिरातीतील /सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी